वर्ष : ०४ | अंक: ३० | मुंबई, मंगळवार १९ जून २०१८ ते २५ जून २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 पाऊस रुसला; १९ जिल्ह्यांत २५ टक्क्यांहून कमी;

3 → अति-अंदाजांच्या वृष्टीचा ताण

अल्पमुदतीसाठी सोने आणि चांदी मंदीत ← 4




# दिल्लीत मोदी विरोधी 'आघाडी'ला तडा



**मुंबई - दिल्ली ही देशाची राजधानी असल्याने सर्वात मोठे सत्ताकेंद्र आहे केंद्र सरकार. या सत्ताकेंद्राच्या अखत्यारीतच दिल्लीला वाटचाल करावी लागते. दिल्लीत राज्य सरकारही काम करते. सद्य:स्थितीत दिल्लीतील ११ जिल्ह्यांचा कारभार 'आप' पाहात आहे. याशिवाय, शहरांची देखभाल करण्याची जबाबदारी महापालिकांकडे आहे. आता दिल्ली महापालिकेचेही उत्तर, पूर्व आणि दक्षिण असे त्रिभाजन झालेले आहे आणि प्रत्येक विभागाला स्वतंत्र महापौर आहे. नवी दिल्लीची महापालिका वेगळी आहे. ज्याला ल्युटन्स दिल्ली म्हटले जाते त्याचा कारभार पाहण्याचे काम नवी दिल्ली महापालिकेकडे आहे. या परिसरात अतिमहत्त्वाची ठिकाणे येतात. देश चालवणाऱ्या व्यक्तींना सोयीसुविधा ही महापालिका पुरवते. शहरातील कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे स्वतंत्र कारभार आहे. यावरून दिल्ली आणि नवी दिल्लीतील सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्यासारखे वाटते.**

पण प्रत्यक्षात दिल्लीची सत्ता राबवण्याचे सर्व अधिकार केंद्राकडेच एकवटलेले आहेत. सद्य:स्थितीत केंद्राची आणि महापालिकांतील सत्ता भाजपच्या ताब्यात आहे. राज्याची सत्ता मात्र आम आदमी पक्षाच्या हाती आहे. हा सगळा विरोधाभास घेऊन दिल्लीचा प्रशासकीय गाडा हाकला जात आहे. या शासकीय-प्रशासकीय रचनेमुळे अनेक गुंतागुंत, मतभेद निर्माण होतात. आता त्यांनी टोक गाठलेले आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याची मागणी केली आहे. तसा ठराव विधानसभेच्या विशेष अधिवेशनात संमत केला गेला आहे. केजरीवाल यांनी केलेली मागणी नवी नाही. यापूर्वी पंधरा वर्षे दिल्लीच्या मुख्यमंत्री राहिलेल्या काँग्रेसच्या शीला दीक्षित यांनीही हीच मागणी केली होती. निर्भया बलात्कार प्रकरणानंतर दीक्षित यांनी पोलीस यंत्रणा केंद्राच्या ताब्यात आहे, दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाल्याखेरीज दिल्लीची सुरक्षा राज्य सरकारला करता येणार नाही असे वक्तव्य केले होते. त्याही आधी भाजपने हीच मागणी केली होती. दोन्ही पक्षांच्या जाहीरनाम्यात या मागणीचा उल्लेख आहे. केजरीवाल यांनी आत्ताच ही मागणी लावून धरली त्याला कारण मोदी सरकार! केजरीवाल यांनी नायब राज्यपाल अनिल बैजल यांच्या निवासस्थानी ठिय्या आंदोलन सुरू केले. त्याला प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या असहकाराचे निमित्त होते पण, हे तात्कालिक कारण झाले. खरे कारण आहे मोदी सरकारने २०१५ मध्ये काढलेली अधिसूचना. या अधिसूचनेनुसार नायब राज्यपालांकडे सत्तेची सर्व सूत्रे एकवटली गेली. म्हणजे ती मोदी सरकारच्या ताब्यात पूर्णत: गेली. पोलीस, जमिनीचे व्यवहार, विकास आराखडा हे अत्यंत महत्त्वाचे विषय केंद्राच्या अखत्यारीत आहेत. मात्र, यावर निर्णय घेताना नायब राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांशी सल्लामसलत करावी असे अपेक्षित आहे. २०१५च्या अधिसूचनेमुळे नायब राज्यपालांवर चर्चेचे बंधन राहिले नाहीच, पण सेवाक्षेत्राचेही निर्णय त्यांच्याकडे आले. या बदलामुळे मुख्यमंत्री म्हणून जे थोडे अधिकार केजरीवाल यांच्याकडे होते त्यावरही त्यांना पाणी सोडावे लागले आहे. उच्च न्यायालयानेही केजरीवाल यांच्याविरोधात निकाल दिला. आता हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यावरील सुनावणी होऊन सहा महिने लोटले तरी सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या खंडपीठाने निकाल दिलेला नाही. न्या. मिश्रांनी असे का केले असावे हे कोडेच आहे. हा सगळा घटनाक्रम पाहिला की केजरीवाल इतके आक्रमक का झालेले आहेत हे समजू शकते.

## भाईंदरमध्ये पाणीपुरीच्या कारखान्यावर छापा



**मीरा रोड - झोपडपट्टीत अत्यंत घाणेरड्या जागेत पाणीपुरीच्या पुऱ्या बनवणाऱ्या बेकायदा कारखान्याचे उत्पादन अन्न व औषध प्रशासनाने बंद केले आहे. पुऱ्या बनवणारे कामगारही गलिच्छ होते. या अशा परिस्थितीत पुऱ्या बनवल्या जात असल्याचे पाहून अन्नसुरक्षा अधिकारीही थक्क झाले.**

भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवलनगर भागातील आनंदनगरमध्ये सुनील चौहान हा पाणीपुरीसाठी लागणाऱ्या पुऱ्या बनवण्याचा कारखाना चालवत असल्याची माहिती अन्नसुरक्षा अधिकारी माणिक जाधव यांना मिळाली. त्यानुसार, त्यांनी या कारखान्यावर छापा टाकला. यावेळी सुनीलकडे पुऱ्या बनवण्यासाठीचा आवश्यक असलेला परवानाच नसल्याचे उघड झाले.

याठिकाणी गलिच्छ अवस्थेत पाच कामगार पीठ मळण्यापासून पुऱ्या तळणे, पॅकिंग आदी कामे करत होते. या कामगारांची कोणतीही वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली नव्हती. कारखान्याच्या आजूबाजूला तुंबलेले नाले व त्यात डुकरे आदी फिरत होते. कारखान्यातसुद्धा अत्यंत घाण होती. जमिनीवरच पुऱ्या लाटल्या जात होत्या. तेलही अत्यंत काळे होते.

महापालिकेच्या अग्निशमन दलाची कोणतीच परवानगी या कारखान्यास नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सिलिंडरचा असलेला साठाही बेकायदा असण्याची शक्यता आहे. सिलिंडरच्या साठ्यामुळे दुर्घटना होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. या गलिच्छ ठिकाणी पाणीपुरीच्या पुऱ्या बनवून त्यांची सर्वत्र विक्री केली जात होती. या ठिकाणी आता पुऱ्यांचे उत्पादन-विक्री बंद करण्याचे आदेश दिले आहेत, असे माणिक जाधव म्हणाले.

## शिवसेनेच्या आदेश बांदेकरांना मंत्रीपदाचा 'प्रसाद'



**मुंबई** - भारतीय जनता पक्षावर नाराज असलेल्या शिवसेनेला खुष करण्यासाठी राज्य सरकारने सिध्दीविनायक ट्रस्टचे अध्यक्ष आदेश बांदेकर यांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा बहाल केला. आदेश बांदेकर हे शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांचे निकटवर्तीय व विश्वासू सहकारी मानले जातात. त्यातच ला शिवसेनेचा वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येलाच मुख्यमंत्र्यांनी बांदेकर यांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा देत नाराजीचा सूर मवाळ करण्याचा प्रयत्न केल्याचे मानले जाते.

आज राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाने शासन निर्णय जाहीर करत सिध्दीविनायक गणपती न्यासाच्या अध्यक्षांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा दिला.


## पालघरच्या केळवे समुद्रात चौघे बुडाले



केळवे येथे पर्यटनासाठी आलेले चार पर्यटक सुमद्रात बुडाल्याची घटना रविवारी दुपारी घडली आहे. हे पर्यटक नालासोपारा येथील होते. आज दुपारी दोन-अडीचच्या सुमारास ही दुर्घटना घडली. बुडालेल्या चौघांपैकी एकाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला असून, तिघांचा शोध सुरु होता.


शनिवार आणि रविवार सलग दोन दिवस सुट्या आल्यामुळे येथे पर्यटकांची संख्या वाढली आहे. केळवा पोलीस ठाणे हद्दीतील दादरा पाडा समुद्र किनारी संतोष भुवन नालासोपारा पूर्व येथील गौरव भिकाजी सावंत (वय १७), संकेत सचिन जोगले (१७), देविदास रमेश जाधव (१६), दिपक परशुराम चालचाडी (२०), दिपेश दिलीप पेडणेकर (१७), श्रीतेज नाईक (१५), तुषार चिपटे (१५) ही ७ मुले पर्यटनासाठी आली होती. दुपारी अडीचच्या सुमारास हे सर्वजण समुद्रात पोहण्यासाठी गेले. यातील चार जण बुडाले. यातील दिपक चालवाडीचा मृतदेह सापडला आहे. तर दिपेश पेडणेकर, श्रीतेज नाईक आणि तुषार चिपटे यांना शोधण्याचे काम सुरू आहे. पोलीस घटनास्थळी उपस्थित होते.

## देशभरात सुरु होणार २५ हजार नवे पेट्रोल पंप



**नवी दिल्ली** - देशातील सरकारी तेल कंपन्या एकाच वेळेस २५ हजार नवे पेट्रोल पंप उघडण्याच्या योजनेवर काम करत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने पेट्रोप पंपाच्या डीलरशिपसाठी नियुक्ती करण्यासाठी असलेली पॉलिसी रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे इंडियन ऑईल, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम यांना मागणीनुसार आपल्या नियमांमध्ये बदल करता येणार आहेत. तसेच नवे पेट्रोल पंप उघडण्याची स्वातंत्रता मिळणार आहे. मंत्रालयाने गेल्या महिन्यात तेल कंपन्यांना पेट्रोप पंप डीलर्सच्या नियुक्तीसाठी गाईडलाईन्स बनवण्यास सांगितलं होतं.

## सौजन्य व्हॉट्सअप




## अमरनाथयात्रेवर दहशतवादी हल्ल्याचे सावट



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)- केंद्र सरकार रमजान ईद झाल्यावर दहशतवाद्यांविरोधात स्थगित करण्यात आलेली मोहीम सुरू करायची की नाही याबाबत विचाराधीन आहे. ही मोहीम स्थगित असतानाच एका सैनिकाला व एका पत्रकाराला ठार करण्यात आले आहे. इतकेच नाही तर अमरनाथ यात्रेवरही दहशतवादी हल्ल्याचे सावट असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली आहे. या हल्ल्याच्या कटामागे पाकिस्तान आहे असेही समजते आहे.**

पाकिस्तानातील दहशतवादी संघटना अमरनाथ यात्रेत अडथळा आणण्यासाठी कट रचत असल्याची माहिती तपास यंत्रणांच्या सूत्रांकडून मिळाली आहे. २९ जूनपासून अरनाथ यात्रेला सुरुवात होते आहे.

रमजानच्या महिन्यात दहशतवातांविरोधात करण्यात येणाऱ्या कारवाईच्या मोहिमांना स्थगिती देण्याचा नेमका काय परिणाम झाला याबाबत एक बैठक पार पडली. या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत अमरनाथ यात्रेबाबत आणि या यात्रेची सुरक्षा वाढवण्यासंबंधीही विचारविनिमय झाला. अमरनाथ यात्रेवर हल्ल्याचे सावट आहे अशात मेहबूबा मुफ्ती सरकारने केंद्राकडे २२ हजार अतिरिक्त सैनिकांची नियुक्ती करावी अशीही मागणी केली आहे.

## नमस्कार मित्रांनो सावधान

**शनिवार दि. २३/६/२०१८ पासुन महाराष्ट्र सरकार, मुंबई महानगर पालिकेनी प्लास्टिक पिशवी, थर्माकोलवर बंदी घातलेली आहे.**

**मुंबई शहरात २०० हुन अधिक इंस्पेक्टर फिरणार आहेत. ज्या कोणाच्या हातात प्लास्टिक पिशवी किवा थर्माकोल दिसेल, त्याला जागेवर ५०००/- रु. दंड आकारणार आहेत.**

**तरी आपण प्लास्टिक पिशवी, थर्माकोल वापरु नका. हि नम्र विनंती.**

**धन्यवाद !**



# पाऊस रुसला: १९ जिल्ह्यांत २५ टक्क्यांहून कमी: शेवटच्या आठवड्यात वाढण्याचा अंदाज

**मुंबई- राज्यात जून महिन्यात गेल्या १८ दिवसांत कुठेही आठवडाभरापेक्षा जास्त दिवस पाऊस पडलेला नाही. पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, औरंगाबाद या जिल्ह्यांमध्ये केवळ दोनच दिवस पाऊस झाला. मान्सून मंदावल्यामुळे पाऊस जूनची सरासरी गाठणार का, हा प्रश्न आहे. जूनची राज्याची सरासरी २२३.३ मिमी आहे, तर प्रत्यक्षात आतापर्यंत केवळ ४८.६ मिमी म्हणजेच २१.८ टक्केच पाऊस झाला आहे.**

हमखास पावसाच्या कोकण आणि पूर्व विदर्भात अजून दमदार पावसाला सुरुवात झालेली नाही. कोकणातील ठाणे, सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, पालघर व विदर्भातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा,



गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत जूनच्या सरासरीच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडला. याशिवाय कोल्हापूर, औरंगाबाद आणि खान्देशातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव यासह राज्यातल्या १९ जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या २५ टक्केही पावसाची नोंद झालेली नाही. देशाच्या विविध भागातल्या हवेच्या प्रतिकूल 'पॅटर्न'मुळे मान्सूनला खीळ बसली आहे. जूनच्या शेवटच्या आठवड्यात पाऊसमान वाढण्याचा अंदाज आहे. 'भारतीय हवामानशास्त्र विभागाचा (आयएमडी) अंदाज चुकला असून पूर्वमान्सून पावसालाच मान्सून पाऊस म्हटले जात आहे,' असा आरोप भौतिकशास्त्रज्ञ किरणकुमार जोहरे यांनी केला आहे. मिनिकॉय, अमिनी, तिरुअनंतपुरम, पुनालूर, कोल्लम, अलापुझा, कोटयम, कोची, त्रिसूर, कोझिकोडे, थलासेरी, कन्नुर, कुडुलू आणि मंगलोर या दक्षिणेतल्या वेधशाळांच्या क्षेत्रातील किमान आठ ठिकाणी सलग दोन दिवस २५ मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस झाल्यानंतर केरळात मान्सून आल्याचे जाहीर केले जाते. जोहरे म्हणतात, 'यंदा 'सागर' आणि 'मेकुणू' या दोन वादळांच्या प्रभावामुळे केरळात जोरदार पाऊस झाला. या पावसानंतर आयएमडीने उतावीळपणे मान्सून आगमनाची वर्दी दिली. वास्तविक हा पूर्वमान्सून पाऊस मान्सून दाखवण्याचा प्रकार होता.'

# मुसलमानांनीच नव्हे तर हिंदूंनीही औरंगजेबच्या हौतात्म्यास सलाम करायला हवा

**मुंबई-** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संरक्षण मंत्र्यांवर टीकास्त्र सोडले आहे. "कश्मीरातील अतिरेक्यांचे थैमान पाहता या देशाला खरेच संरक्षणमंत्री आहे काय? असा प्रश्न पडला आहे. अत्यंत कमजोर व कुचकामी, बिनचेहऱ्याची व्यक्ती संरक्षणमंत्री पदावर बसवून आपण देशाचे नुकसान करीत आहोत", अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी निर्मला सीतारामन यांच्यावर टीका केली आहे. शिवाय, "औरंगजेबासारखे अनेक मुसलमान जवान देशासाठी कश्मीरच्या रणभूमीवर शहीद होत आहेत व देशाने त्यांच्याविषयी सदैव अभिमान बाळगायला हवा. देशातील मुसलमानांनीच नव्हे तर हिंदूंनीही औरंगजेबाच्या हौतात्म्यास सलाम करायला हवा. आम्ही त्याच्या हौतात्म्याला झा ु वा ू ँ ना मानवंदना देत आहोत. असा औरंगजेब



या देशातील प्रत्येक मुसलमानाच्या घरात निर्माण व्हावा'',असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी शहीद जवान औरंगजेबबाबत गौरवोद्गार काढले आहेत. कोणत्याही संकटाचा सामना करण्यास आमचे संरक्षण दल नेहमीच सज्ज असते. तीनही सेनादलांचे प्रमुख तसे सांगत असतात, पण कश्मीरातील अतिरेक्यांचे थैमान पाहता या देशाला खरेच संरक्षणमंत्री आहे काय? असा प्रश्न पडला आहे. अत्यंत कमजोर व कुचकामी, बिनचेहऱ्याची व्यक्ती संरक्षणमंत्री पदावर बसवून आपण देशाचे नुकसान करीत आहोत.

## सेल्फीचा मोह टाळा, समुद्राच्या लाटेने मित्राला ओढून नेले, मित्रांना समजलेच नाही

**मुंबई-** सेल्फीचा मोहापायी एक तरुणाला जीव गमवावा लागला आहे. समुद्र किनाऱ्यावर बसलेल्या तीन मित्रांपैकी एक जण मोठ्या लाटेसह समुद्रात वाहून गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना गोव्याच्या सीकेरी किनाऱ्यावर



रविवारी घडली. मिळालेली माहिती अशी की, शशीकुमार वासण (वय- ३३) असे मृत तरुणाचे नाव असून तो मूळ तामिळनाडू येथील होता. काही वेळाने त्याचा मृतदेह वाहून किनाऱ्यावर आला. पोलिसांनी त्याचा मृतदेह गोमेकॉच्या शवागृहात पाठवून पुढील तपास सुरु आहे. तामिळनाडूतील चार मित्र गोव्याला फिरण्यासाठी आले होते. सूर्योदय पाहण्यासाठी ते आग्वाद किल्ल्याखालील सीकेरी येथील खडकावर गेले होते. चौघांपैकी तीन जण खडकावर बसून सेल्फी आणि लाटांचा आनंद घेत होते. तर चौथा मित्र त्यांचा व्हिडिओ बनवत होता.

## मालवाहतूकदारांचा देशव्यापी संप, महागाई भडकणार

**मुंबई-** डिझेलच्या वाढत्या किंमतीच्या विरोधात वाहतूकदारांनी आजपासून देशव्यापी बेमुदत संप पुकारला आहे. या संपात देशभरातील ६० टक्के ट्रकचालक सहभागी झाले असून संप आणखी काही दिवस सुरू राहिल्यास महागाईचा भडका उडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. 'सरकारचं इंधन दरवाढीवर नियंत्रण राहिलं नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवाढ झाल्यानं इंधन दरवाढ करण्यात आल्याचं कारण सरकार देत आहे. पण केंद्र सरकार आणि राज्यसरकारांच्या करांमुळे ही दरवाढ झाल्याचं आमचं



मत आहे,' असं ऑल इंडिया कन्फेडरेशन ऑफ गुड्स व्हेईकल्स ऑनर्स असोसिएशनचे अध्यक्ष चन्ना रेड्डी यांनी सांगितलं. आजच्या संपात ९० लाख ट्रकचालक उतरणार असल्याचंही ते म्हणाले. तर पश्चिम बंगालमध्ये ३.५ लाख ट्रकचालक संपात सहभागी झाल्याचा दावा बंगाल ट्रक ऑपरेटर असोसिएशनचे संयुक्त सचिव सजल घोष यांनी केला.

## सीएसएमटी ते मुंबई सेंट्रल दरम्यान मेट्रो ३ च्या भुयाराचं काम पूर्ण

**मुंबई-** मेट्रो ३ च्या भुयारी मार्गाच्या कामाने जोर धरला आहे. मेट्रो तीन अंतर्गत येणाऱ्या सीएसएमटी ते मुंबई सेंट्रल दरम्यान रेल्वेकडून नुकतेच एका भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्यात आले. याबाबतचा व्हिडीओ मुंबई मेट्रो ३ ने ट्विट केला आहे. टनेल बोरिंग मशिनच्या (टीबीएम्स) सहाय्याने या भुयाराचं काम करण्यात आले. या भुयाराची लांबी एकूण ८६० मीटर आहे. याच प्रकल्पात आणखी एक बोगदा तयार करण्यात येणार आहे. भुयार सात हजार सहाशे चाळीस मीटर लांबीचे असणार आहे. टीबीएमद्वारे मुंबई



सेंट्रलपर्यंत या भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या मशिनस्ला महाराष्ट्रातील सूर्या, वैतरणा, तानसा, कृष्णा, गोदावरी, तापी आणि वैनगंगा या नद्यांची नावे देण्यात आले आहेत.

## भाजप हा शिवसेनेमुळे मोठा झालेला पक्ष - गजानन किर्तिकर

**मुंबई-** देशात चारच पक्ष मोठे आहेत. त्यात भाजप हा पक्ष शिवसेनेमुळे मोठा झाला असल्याचे शिवसेनेचे खासदार गजानन कीर्तिकर यांनी म्हटले आहे. ते सांगली मध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते. राष्ट्रवादी, काँग्रेस, भाजप आणि शिवसेना हे चार पक्ष महाराष्ट्रामध्ये मोठे आहेत. यामध्ये शिवसेनेची मोठी ताकद आहे. त्यामुळे आम्ही स्वतंत्र लढलो तर काँग्रेस राष्ट्रवादीला फायदा होईल असे वाटत नाही. त्याचा फायदा शिवसेनेलाच होईल. भाजपने शिवसेनेला उपमुख्यमंत्री पद दिले नाही कॅबिनेट मंत्री पद दिले नाही. तसेच, भाजप जर हिंदुत्ववादी असते. तर, त्यांनी सरकार स्थापन केल्यावर राम मंदिर बांधले असते. भाजप हे हिंदुत्ववादी नाही असे जनसामान्यांतून प्रतिक्रिया उमटत आहेत, असेही कीर्तिकर यावेळी म्हणाले. काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे १२ ते १३ विद्यमान नगरसेवक हे शिवसेनेमध्ये पक्ष प्रवेश करणार आहेत, असा खुलासाही कीर्तिकर



यांनी केला. त्यामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादीला फटका बसणार आहे. तसेच, सांगली महापालिका ही निवडणूक शिवसेना स्वतंत्र लढणार आहे. काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी होईल पण भाजप-शिवसेना आघाडी होणार नाही.

## प्लास्टिक बंदी! ५ ते २५ हजार दंड, ३ वर्षे तुरुंगवास

**मुंबई-** राज्य सरकारच्या आदेशानुसार येत्या २३ जूनपासून प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांना ५ हजारापासून ते २५ हजार रुपयांपर्यंत दंड होणार आहे. तसेच, तीन वर्षे तुरुंगवासाची शिक्षाही होऊ शकते. ही दंडात्मक कारवाई करण्यासाठी मुंबई महापालिका सज्ज झाली आहे. राज्य सरकारने प्लास्टिकची विल्हेवाट लावण्यासाठी तीन महिन्यांची मुदत दिली होती. ही मुदत आता २३ जूनला संपणार आहे. प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने दंडात्मक कारवाईसाठी महापालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींना मोठी यंत्रणा राबवावी लागणार आहे. मुंबईत पूर्णपणे प्लास्टिकबंदी करण्यासाठी महापालिकेच्या प्रशासनाकडून उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. यासाठी मार्केट, परवाना विभाग, दुकान आणि आस्थापना विभागाच्या निरीक्षकांची स्वतंत्र पथके तयार करण्यात येत आहे. तसेच मुंबई महापालिकेने



प्लास्टिकच्या पर्यायाविषयी माहिती देण्यासाठी वरळी येथे २२ ते २४ जूनला एका प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामध्ये अभिनेता अजय देवगण आणि काजोल यांच्यासह अनेक सेलिब्रिटी असणार आहेत. दरम्यान, प्लास्टिकचा पर्यायी उपाय नसल्यामुळे व्यापारी आणि लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. प्लास्टिक पिशव्यांशिवाय थर्मोकोल, स्ट्रॉ, कॅरिबॅग, थर्माकोलचे पेले, थाळ्या, कप, प्लॅस्टिकचे कप, पेले, ताटल्या यासह अनेक प्लास्टिकच्या उत्पादनांवर बंदी घातली आहे.

## थोडक्यात

### सिझेरियन प्रसुतीबाबतची ८ धक्कादायक सत्य !

**मुंबई-** आजकाल नॉर्मलपेक्षा सिझेरियन पद्धतीने (ऑपरेशनद्वारा) बाळाला जन्म देण्याचं प्रमाण वाढलयं. WHO ने दिलेल्या अहवालानुसार, १३७ देशांमधील अहवालानुसार, जगभरातील केवळ १४ देशांमध्ये गरजेनुसार योग्य स्वरूपात सिजेरियन पद्धतीने बाळाला जन्म दिला जातो. सिझेरियन पद्धतीबाबत लोकांच्या मनात अनेक समज - गैर समज आहेत. अशाच काही आश्चर्यकारक गोष्टी तुम्ही नक्की जाणून घ्या. WHO ने नमूद केलेल्या १४ देशांव्यतिरिक्त इतर देशांमध्ये गरजेपेक्षा जास्त प्रमाणात सिझेरियन पद्धतीने बाळाला जन्म देण्यासाठी दबाव टाकला जातो. WHO ने दिलेल्या माहितीनुसार, बाळ



किंवा आईच्या जीवाला धोका असल्यास सिझेरियन करण्याचा निर्णय घेतला जातो. जगात असे अनेक देश आहेत जेथे आईची दुसरी प्रसुती ही सिझेरियन पद्धतीने केली जाते. ब्राझिल, टर्की, इजिप्त या देशांमध्ये केवळ ५०३ महिलांची प्रसुती ही सिझेरियन पद्धतीने केली जाते.

भारतात सिझेरियनबाबत फार वाईट अवस्था नाही. भारतात सुमारे १८३ महिलांची प्रसुती सिझेरियन पद्धतीने होते. मात्र भारतातील काही प्रमुख राज्यात, मेट्रो सिटीमध्ये सिझेरियन पद्धतीने प्रसुती करण्याचे प्रमाण अधिक आहे. मुंबई, दिल्ली अशा शहरांमध्ये वास्तव धक्कादायक आहे. दिल्लीतील खाजगी रुग्णालयात ६५३ मुलांचा जन्म सिझेरियन पद्धतीद्वारा होतो. काही महिला त्यांच्या मर्जीने असे करतात तर काहीवेळेस डॉक्टर रुग्णांवर दबाव टाकतात.

### बलात्कारी बापाने बायकोला कोर्टात ठार मारले

**मुंबई-** आसाममधल्या दिब्रुगड कोर्टात लहान मुलीवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात गेलेल्या बापाने त्याच्या बायकोला कोर्टात ठार मारले. मुलीच्या बलात्काराचा खोटा आरोप लावल्याने



आपण बायकोला ठार मारल्याचं या आरोपीचं म्हणणं आहे. ९ महिन्यापूर्वी पूर्ण डेकावर त्याच्या बायकोने पोटच्या मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप केला होता. या आरोपांनंतर त्याला अटक करण्यात आली होती. या प्रकरणाची शुक्रवारी सुनावणी होती. सुनावणीदरम्यान पूर्णे एक धारदार शस्त्र काढलं आणि कोर्टातच बायकोचा गळा चिरला. बायकोला रुग्णालयात नेईपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. सप्ताहाच्या प्रथम चरणात मनातील इच्छा व आकांक्षा पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न यशस्वी होतील. दूर निवासी प्रिय व्यक्तीचे भेटीयोग जुळून येतील व मानसिक सुख-शांती व समाधान लाभेल. यश समोर दिसू लागेल. अंतिम चरणात परिस्थिती थोडी प्रतिकूल आहे. त्यामुळे सावधानता ठेवूनच वाटचाल करणे आवश्यक ठरेल. कोणत्याही बाबतीत वस्तुस्थितीचा आढावा घेऊनच अंतिम निर्णय घेणे चांगले ठरेल. त्यामुळे होणारे नुकसान टळेल.

### भक्तांची संख्या घटल्याने भय्यू महाराजांची आत्महत्या?

**मुंबई-** स्वयंघोषित आध्यात्मिक गुरू भय्यू महाराज यांच्या आत्महत्येबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. कौटुंबिक कलहापाठोपाठ त्यांचे दुसरे लग्न हे सुद्धा त्यांच्या आत्महत्येचे कारण असल्याचे सांगितले जात आहे. दुसरे लग्न झाल्यामुळे भय्यू महाराज यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली होती. त्यांच्या भक्तांची संख्याही घटली होती. शिवाय राजकारण्यांचा राबताही कमी झाला होता. त्यामुळे ते तणावात होते. त्यातूनच त्यांनी आत्महत्या केल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. भय्यू महाराज यांच्या मृत्यूनंतर इंदूर पोलिसांनी तीन दिवस केलेल्या चौकशीतून अनेक तथ्य समोर आले आहेत. भय्यू महाराज यांच्या कुटुंबीयांच्या आणि भक्तांच्या चौकशीतून त्यांनी तणावातूनच आत्महत्या केल्याच्या निष्कर्षापर्यंत पोलीस पोहोचले आहेत. मात्र भय्यू महाराज यांची हत्या झाल्याची शक्यता पोलिसांनी पूर्णपणे फेटाळून लावली आहे.



# मुलांच्या भेटीसाठी पित्यांचा निवडणुकीत 'नोटा'

**मुंबई-** घरात २० दिवसांचे तान्हुले... बायकोशी वाद झाला... भांडण विकोपाला गेल्यानंतर बायकोने घर कायमचे सोडले. आपल्या दीड वर्षाच्या मुलाला जन्मानंतर तो पिता केवळ दोनदाच पाहू शकला. मुलाच्या भेटीची आस लागलेल्या अशा तब्बल ३० हजार पित्यांनी यासाठी सरकारकडून कायद्याची मदत न झाल्यास येत्या लोकसभा निवडणुकीत 'नोटा' वापरण्याचा निर्णय घेतला आहे. दुसऱ्या घटनेत न्यायालयाने वडिलांच्या बाजूने निकाल दिल्यानंतर बायको तेथूनच पळून गेली. नऊ महिन्यांपासून तो पिता आपल्या मुलाला भेटण्यासाठी तडफडत आहे. मुलांपासून दुरावलेल्या अशा अनेक वडिलांना आपल्या मुलाची भेट हवी आहे.




ही भेट होण्यासाठी त्यांना सरकारकडून कायदेविषयक मदत पाहिजे आहे. रविवारी जगभरात 'फादर्स डे' साजरा केला जात असताना आपल्या मुलांपासून दुरावलेल्या या पित्यांनी निवडणुकीत 'नोटा' वापरण्याचा निर्णय पक्का केला. 'वास्तव फाऊंडेशन'तर्फे पुरुषांच्या हक्कांबाबत आवाज उठवण्यासाठी विविध कार्यक्रम घेतले जातात. रविवारी फादर्स डेनिमित्ताने असाच कार्यक्रम मुंबईत झाला. कोर्टकचेरीत बायकोशी तंटा सुरू असलेल्या, पोलिस तक्रारींनंतर मुलाशी दुरावलेल्या तब्बल ५० पुरुषांनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने 'फादर्स डे'चे सेलिब्रेशन केले. थॅलेसेमियाग्रस्त मुलांची रक्ताची गरज पूर्ण करण्यासाठी या पित्यांनी रक्तदान केले. आपल्या मुलाला भेटू शकत नसलो, तरीही रक्तदानातून त्यांनी बापाचे प्रेम व्यक्त केले. कोणी मुलाला दोन वर्षांपासून पाहिलेले नाही, तर 'फादर्स डे' असतानाही काहींना मुलाची भेट नाकारली गेली. या दुःखाने व्यथित झालेल्या सर्व वडिलांनी आता सरकारनेच कायदेशीर पद्धतीने आपली मुलाशी भेट घडवावी, अशी मागणी केली आहे.

# शिवसेना आवडे देणगीदारांना

**मुंबई- या देशाच्या आर्थिक राजधानीतील महानगरपालिकेसह ठाणे महानगरपालिकेची सत्ता ताब्यात असलेली आणि आणि राज्यातील सरकारमध्ये भागीदार असलेली शिवसेना ही देशातील सर्व प्रादेशिक पक्षांमध्ये राजकीय देणग्या मिळवण्यात अव्वल ठरली आहे. शिवसेनेला २५ कोटी ८४ लाख रुपयांच्या देणग्या मिळाल्या असून रोमा बिल्डर्स प्रा. लि, भैरवनाथ शुगर वर्क्स लि., ओंकार रिअॅल्टर, कल्पतरू प्रॉपर्टीज, पॅलाडियम कन्स्ट्रक्शन, रुबी मिल्स, नहार बिल्डर्स अशा मंडळींचा बड्या देणगीदारांत समावेश आहे.**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या नियमाप्रमाणे प्रत्येक राजकीय पक्षाला त्याला मिळणाऱ्या देणग्यांचा तपशील सादर करावा लागतो. २० हजार रुपयांपेक्षा मोठ्या रकमेच्या प्रत्येक देणगीचा तपशील बड्या कंपन्या आणि इतर छोटे-वैयक्तिक देणगीदार अशी विभागणी करून आयोगाला सादर करावा लागतो. २०१६-१७ मध्ये राजकीय पक्षांना मिळालेल्या देणग्यांचा तपशील निवडणूक आयोगाला जाहीर केला असून त्यात प्रादेशिक पक्षांचा विचार करता मुंबईवर सत्ता गाजवणारी शिवसेना ही देणगी मिळवण्यात आघाडीवर आहे. रोमा बिल्डर्स प्रा. लि.ने प्रत्येकी १ कोटी रुपयांच्या पाच धनादेशांद्वारे ५ कोटी रुपये, भैरवनाथ शुगर वर्क्स लि.ने प्रत्येकी २ कोटी रुपयांच्या दोन वेगवेगळ्या धनादेशांद्वारे एकूण ४ कोटी रुपये, मॉडर्न रोड मेकर्स प्रा. लि. या कंपनीने दोन कोटी रुपये, ए. एन. इंटरप्रायजेस इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिस प्रा. लि.ने दोन कोटी रुपये, कल्पतरू प्रॉपर्टीज लि. ने ५५ लाख रुपये, जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.ने २५ लाख रुपये, पॅलाडियम कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि.ने ६ लाख रुपये, ओंकार रिअॅल्टर्स अॅण्ड डेव्हलपर्सने ४ लाख रुपये, नहार बिल्डर्सने एक लाख रुपये अशारीतीने ७१ कॉर्पोरेट देणगीदारांनी एकूण १८ कोटी ३ लाख ४ हजार ७०१ रुपयांची देणगी दिल्याचे शिवसेनेने निवडणूक आयोगाकडे दाखल केलेल्या ताळेबंदात म्हटले आहे. याशिवाय वैयक्तिक देणगीदार, शिवसेनेच्या विविध संस्था यांच्याकडून ७ कोटी ८१ लाख रुपयांचा निधी पक्षाला राजकीय देणगीच्या स्वरूपात मिळाला आहे. त्यात शिवसेना चित्रपट सेनेकडून ४० लाख रुपये, आमदार नीलम गोऱ्हे यांच्याकडून एक लाख ११ रुपये, पूर्वेश प्रताप सरनाईक ५० हजार रुपये, परिशा प्रताप सरनाईक ५० हजार रुपये, बालाजी किणीकर १ लाख रुपये यांच्यासारख्या शेकडो वैयक्तिक देणगीदार व छोट्या व्यावसायिकांचा समावेश आहे.

## नीरव मोदीवर आणखी एक गुन्हा?

**मुंबई-** सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) हिरे व्यापारी नीरव मोदींने केलेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीदरम्यान त्याने सीमाशुल्क बुडवल्याचेही उघड झाले आहे. त्यामुळे महसूल गुप्तवार्ता संचालनालय (डीआरआय) त्याच्याविरोधात नवा गुन्हा दाखल करण्याची शक्यता आहे.



ईडीच्या तपासानुसार नीरव मोदी हा अमेरिका, दुबई व हॉंगकॉंगमध्ये कमी प्रतीचे हिरे चांगल्या प्रतीचे आहेत, असे दाखवून निर्यात करीत असे. तेच हिरे पुन्हा भारतात आयात केले जात असत. त्याद्वारे तो सीमाशुल्कात सवलत मिळवत असल्याचा संशय आहे. त्यामुळे या प्रकरणी त्याच्याविरोधात सीमाशुल्क कायद्यान्वये आणखी एक गुन्हा दाखल होऊ शकतो का, याबाबत कायदेशीर सल्ला घेतला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले.

डीआरआयने मोदीविरोधात २०१४ मध्ये कारवाई केली होती. सुरत विशेष आर्थिक क्षेत्रातील (एसईझेड) 'फायर डायमंड इंटरनॅशनल' ही कंपनी कमी प्रतीचे हिरे जास्त दराचे दाखवून निर्यात करत असल्याची माहिती डीआरआयला मिळाली होती. त्यानुसार ५ डिसेंबर २०१४ रोजी डीआरआयने सहार विमानतळावरील कार्गो परिसरात कारवाई करत फायर डायमंड इंटरनॅशनल प्रा.लि. च्या सहा व फायरस्टार इंटरनॅशनल प्रा. लि. च्या दोन कन्साइनमेंट ताब्यात घेतल्या. हा माल कॅनडा, अमेरिका, दुबई व हॉंगकॉंग येथे पाठविण्यात येत होता. यातील हिरेजडित दागिन्यांची किंमत ४३.१० कोटी रुपये दाखविण्यात आली होती; पण तपासणीत हा माल ४.९३ कोटी रुपयांचाच असल्याचे निष्पन्न झाले होते.

## संपादकीय...

# अति-अंदाजांच्या वृष्टीचा ताण


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

'भारतात हवामान संशोधक नाहीत, केवळ माहितीचे विश्लेषण करणारे सरकारी अधिकारी आहेत, म्हणून अंदाज चुकतात' अशी टीका आपल्या हवामान विभागावर वेळोवेळी होतच असते. मोसमी पावसाचा अंदाज लावणे कठीण आहे, हे सर्वानाच मान्य आहे. अनेकदा एक दिवस आधीही पावसाचा योग्य अंदाज करता येत नाही. गेल्या वर्षी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत झालेल्या अतिवृष्टीचा अंदाज न येणे हे त्यापैकीच एक. एवढेच नाही तर ३० ऑगस्टला मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त झाल्यावर प्रत्यक्षात पडलेल्या उन्हाची आठवणही सामान्यांच्या मनातून गेली नसेल. या पार्श्वभूमीवर केरळमध्ये मोसमी वारे पोहोचण्याच्या आधीच मुंबईत दहा दिवसानंतर प्रलय येण्याइतपत पाऊस पडेल असे 'स्कायमेट' या खासगी हवामान संस्थेने जाहीर केले. आजमितीला कोणत्याही खासगी संस्थेकडे हवामानाची निरीक्षणे नोंदवण्याची यंत्रणा नाही. भारतीय हवामान खात्याकडून प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या एनडब्लूयूपी प्रारूपाच्या माहिती आधारेच खासगी संस्था अंदाज व्यक्त करतात. न्युमेरिकल वेदर प्रेडिक्शन एनडब्लूयूपी प्रारूपाने -गणिती समीकरणांतूनच- अंदाज व्यक्त केला जातो. हे अंदाज अनेकदा चुकतात. त्यांना त्या वेळच्या वास्तविक हवामानाची- उपग्रहामार्फत येणाऱ्या प्रतिमा, वाऱ्याचा वेग, दिशा, हवेचा दाब- अशा अनेक घटकांची जोड द्यावी लागते. खासगी संस्थांकडे या प्रकारे हवामानाची माहिती घेणारी यंत्रणा नाही. मात्र तरीही खासगी संस्थेने दहा दिवसांपूर्वी दिलेल्या अंदाजाने घबराट पसरली. ५ जून रोजी हवामान विभागानेही कोकणपट्टीत मुसळधार पावसाचा व काही ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज व्यक्त केला. या कोकणपट्टीच्या सहा जिल्ह्यांत मुंबईचाही समावेश होता. खरे तर पावसाच्या चार महिन्यांपैकी साधारण साठ दिवस कोकण किनारपट्टीत अशा प्रकारे धोक्याचा बावटा रेड ॲलर्ट असतो, हे या यंत्रणांशी संबंधित सर्वांना माहिती आहे. गुप्तचर विभागाकडून मुंबईतही अनेकदा असाच 'रेड ॲलर्ट' दिलेला असतो; मात्र तो घातपाताचा इशारा आला म्हणून पोलीस किंवा सरकारी यंत्रणा तो तातडीने जाहीर करून सर्व काम थांबवत नाही. धोक्याचा बावटा असूनही कोकणपट्टीत एखाद्या तालुक्यात भरपूर पाऊस पडतो तर इतरत्र कधी कधी टिपूसही पडत नाही. त्यामुळे आदल्या दिवसापर्यंत त्याबाबत कोणीही भाष्य करीत नाही. मात्र खासगी संस्थेने व्यक्त केलेल्या अंदाजाची सरकारी विभागाने री ओढण्याचे कारण काय? तो अंदाज योग्य ठरला आणि भरपूर पाऊस पडला तर आपल्यावर टीका नको, या सुप्त भीतीतून हवामान विभागही अतिवृष्टीच्या अंदाजावर ठाम राहिला असावा. अंदाज देऊनही कोणतीच तयारी केली नाही तर आपल्यावर जबाबदारी पडेल म्हणून सरकारी यंत्रणांनी सर्व सज्जता केली. सर्व संबंधित अधिकाऱ्यांची शनिवार, रविवारची सुट्टी रद्द करण्यात आली. यावेळी शनिवार, रविवार असल्याने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली नाही, एवढेच. शनिवारी मुंबईत अतिवृष्टी होणार नाही, याचा अंदाज शुक्रवारी आला. मात्र तो अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आला नाही. प्रत्यक्षात शनिवारी काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडला, रविवारी तर ऊनही पडले. मुंबई शनिवारी खोळंबली, तुंबली हे खरे; पण तो 'अतिवृष्टीचा कहर' नसून भरती आणि पाऊस या दोघांनी नेमकी सकाळ-संध्याकाळची वेळ गाठल्याचा वाटा त्यात मोठा होता. नालेसफाईच्या धीम्या गतीपासून अनधिकृत बांधकामांपर्यंत अनेक गोष्टींचा परिणाम होता. हाताशी अद्ययावत यंत्रणा नसताना, त्याचे योग्य विश्लेषण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नसताना आणि खासगी संस्थेच्या अंदाजांचा भार वाहताना भारतीय हवामान विभागाने अधिक जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. ते न होता हे असले अतिअंदाज बरसतच राहिले, तर त्यांचा ताण सरकारी यंत्रणांसोबत सामान्यांनाही सहन करावा लागणार.



# काश्मीर प्रश्नाचा मार्ग बदला

***भ्रष्टाचार, पाकिस्तान आणि काश्मीर समस्या हे भाजपचे तीन महत्त्वाचे निवडणूक मुद्दे होते. यातील पहिल्याच्या नियंत्रणाबाबत सरकारला यश आले असा एका वर्गाचा समज आहे आणि उर्वरित दोनांच्या हाताळणीत नरेंद्र मोदी सरकार सपशेल अपयशी असल्याचे सरसकट सर्वाचे मत आहे. ज्या उद्योगसमूहाने शिवणाच्या सुयादेखील कधी बनवल्या नाहीत त्या समूहास थेट हवाईदलासाठीची राफेल विमाने बनवण्याचे कंत्राट हिंदुस्थान एअरोनॉटिक्स या त्याच क्षेत्रातील सरकारी कंपनीस डावलून का दिले याचे उत्तर जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत पहिल्या मुद्द्याच्या यशाबाबत संशय कायम राहणार. परंतु उर्वरित दोन विषयांच्या हाताळणीतील सरकारी अपयशाबाबत मात्र काडीचाही संशय नाही. यातील काश्मीर समस्येतील अपयश हे अधिक दाहक आहे आणि ते आपल्याच भूमीवर सहन करावे लागत असल्याने त्याची तीव्रता अधिक आहे. काश्मीर प्रश्नाबाबत या सरकारच्या अब्रूची लक्तरे दिवसागणिक आंतरराष्ट्रीय वेशीवर टांगली जात असून मनमोहन सिंग सरकारवर नेभळटपणाचा आरोप करणारा भाजप या मुद्द्यावर पूर्णपणे दिङ्मूढ झालेला आहे. धडाडी, कार्यक्षमता आणि निर्णयचापल्य यांचा दावा करणाऱ्या या सरकारवर अशी वेळ का आली?***

या प्रश्नाचे उत्तर या सरकारच्या धोरण धरसोडीत आहे. जम्मू काश्मीरचे नक्की काय आणि कसे करायचे, येथूनच सरकारचा गोंधळ सुरू होतो. या प्रश्नाकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बौद्धिकी चष्म्यातून पाहायचे की मुत्सद्देगिरीच्या वास्तव जाणिवेतून त्याचा विचार करायचा, हेच या सरकारला कळलेले नाही. संघाच्या नजरेतून पाहावयाचे तर घटनेतील अनुच्छेद ३७० लाच हात घालायला हवा. हे अयोध्येत बाबरी मशीद पाडण्याएवढे सोपे नाही. याची अत्यंत प्रागतिक जाणीव भाजपचे असूनही अटलबिहारी वाजपेयी यांना होती. त्यामुळे त्यांनी काश्मीर प्रश्नावर सर्वांना सामावून घेणारी भूमिका घेतली. परंतु हिंदुत्वाच्या नावे शड्डू ठोकणाऱ्यांना वाजपेयी नकोसे होते. वाजपेयी यांचे सरकार पूर्णपणे स्वबळावरचे नव्हते. तेव्हा परिवारातील वाजपेयी विरोधक आम्हास पूर्णपणे बहुमत मिळेल तेव्हा अनुच्छेद ३७०ला हात घालून काश्मीरचा प्रश्न कायमचा सोडवू असे सांगत.

या मंडळींना २०१४ साली हे बहुमत मिळाले. त्यास चार वर्षे होऊन गेली. परंतु अनुच्छेद ३७० मधील अदेखील या सरकारला उच्चारता आलेला नाही. तसे करताही येणार नाही. याचे कारण विरोधी पक्षात वाटेल त्या विषयावर शंखनाद करणारे सत्तेवर आले की शीळदेखील वाजवू शकत नाहीत, हे वास्तव आहे. मोदी सरकारने अनेक बाबतीत ते दाखवून दिले. परंतु या सरकारला भान आले म्हणून याबाबत समाधान व्यक्त करण्याची देखील सोय नाही. कारण या सरकारचा लंबक इतका दुसऱ्या टोकाला गेला की ज्यांना इतकी वर्षे पाकिस्तानवादी, फुटीरतावादी ठरवले त्या मुफ्ती महंमद सैद यांच्या पक्षाशीच भाजपने सत्तेसाठी हातमिळवणी केली. धर्मांतर केलेला अधिक मोठ्याने बांग देतो, त्याचे हे उदाहरण. वास्तविक हे भाजपस भान येत असल्याचे लक्षण मानता आले असते. सुरुवातीला ते तसे होतेही. म्हणून आम्हीही मेहबूबा मुफ्ती यांच्याशी युती करण्याच्या भाजपच्या या प्रागतिक निर्णयाचे स्वागतच केले. परंतु भाजपनेच आपल्या राजकारणाने ते क्षणिक ठरवले. एका बाजूने राजकीय शहाणपण दाखवत मेहबूबा मुफ्ती यांच्या पक्षाशी सत्ता सोयरीक करायची, परंतु त्याच वेळी मागच्या राजकारणाची सूत्रे ही राम माधव यांच्यामार्फत संघीय विचारधारेत अडकवून ठेवायची. यातून भाजपचा वैचारिक गोंधळच दिसतो. या विचार आणि कृतीत ना राम होता ना त्यात काही माधव आहे.

हा गोंधळ भाजपने प्रत्येक मुद्द्यावर घातला. कोणास आवडो वा न आवडो. काश्मिरातील सर्व घटकांशी चर्चा करण्याखेरीज कोणत्याही पक्षाच्या आणि कितीही इंचाची छाती असलेल्या नेत्यास पर्याय नाही. भाजप सरकारने ही बाब लक्षात घेतली नाही. हुरियतशी बोलायचे नाही, ही पहिली भूमिका. तत्त्व म्हणून ती समजा मान्य जरी केली तरी या सरकारी विचारधारेची पंचाईत अशी की जम्मू वा लडाख प्रदेश सोडला तर खोऱ्यातील प्रत्येक नागरिक.. अर्थातच मुसलमान.. जणू फुटीरतावादी आहे, अशीच या मंडळींची धारणा. त्यामुळे त्या आघाडीवर सरकारची कोंडी झाली. म्हणून एक पाऊल मागे घेत सरकारने बोलण्याची तयारी केली. तरीही पंचाईतच. कारण पाकिस्तानचे काय करायचे याबाबतही गोंधळ. त्या देशाशी नाही बोलायचे म्हणावे तर पंतप्रधानच जातीने नवाज शरीफ यांचे त्यांच्या घरी जाऊन अभीष्टचिंतन करणार. म्हणजे पुन्हा लंबक दुसऱ्या दिशेला. त्यातही परत नि:संदिग्धता नाहीच. दहशतवाद आणि चर्चा एकाच वेळी होणार नाही, ही या सरकारची भूमिका. सत्ताधारी पक्षाचा प्रत्येक छोटामोठा अधिकारी याच भूमिकेचे तुणतुणे वाजवत असतो. ते खरे मानायचे तर मग दिनेश्वर मिश्रा यांना काश्मीर प्रश्नावर संवादक म्हणून नेमण्याचा अर्थ काय? यातून केवळ धोरण धरसोडच दिसते. काश्मीरचे दुर्दैव असे की चर्चा व्हावी आणि ती होऊ नये अशा दोन टोकाच्या भूमिका असणाऱ्यांकडून लक्षवेधनासाठी दहशतवादाचाच मार्ग अवलंबिला जातो आणि त्यात हकनाक अश्राप काश्मिरींचा बळी जात राहातो. आताची परिस्थितीही याच गोंधळाची निदर्शक आहे. रमझानच्या निमित्ताने शस्त्रसंधी सरकारने जाहीर केली खरी.



# ठाण्यातील सीडीआरप्रकरणी मुख्य सुत्रधाराला दिल्लीतून अटक

**ठाणे-** ठाण्यात अनधिकृतरित्या मोबाईल कंपन्यांचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड (सीडीआर) काढल्याचे प्रकरण गेल्या तीन महिन्यांपासून चर्चेत आहे. यामध्ये अनेक मोठ्या व्यक्तींबरोबरच बॉलिवूड अभिनेत्यांचा सहभागही उघड झाला आहे. दरम्यान, झालेल्या ताज्या कारवाईत अशा प्रकारे बेकायदेशीर सीडीआर काढून देणाऱ्या मुख्य सुत्रधाराला दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. ठाणे पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून ही कारवाई करण्यात आली आहे. सौरव साहू असे अटक करण्यात आलेल्या मुख्य सुत्रधाराचे नाव असून काल रात्री दिल्ली येथून त्याला ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी आजवर अनेक मोठी नावे समोर आली असून त्यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली आहे.

यामध्ये बॉलिवूडमधील अनेक प्रसिद्ध नावांचाही समावेश आहे. सौरव साहू याने यापूर्वीही अशाच प्रकारे अवैधरित्या सीडीआर काढण्याचे काम केले असून यापूर्वी दिल्ली आणि मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने त्याच्यावर अटकेची कारवाई केली आहे. भारतामध्ये पोलिसांची परवानगी असल्याशिवाय सीडीआर काढता येत नाही. त्यामुळे अवैधरित्या कोणाच्याही



फोन कॉल्सची माहिती मिळवल्यास तो गुन्हा ठरतो. ठाणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने सीडीआर प्रकरणाचा खुलासा केल्यानंतर राज्यात एकच खळबळ उडाली होती. बेकायदा लोकांचे सीडीआर काढल्याप्रकरणी पोलिसांनी आत्तापर्यंत डझनभर लोकांना अटक केली आहे. यामध्ये भारतातील पहिल्या महिला गुप्तहेर रजनी पंडित यांचाही समावेश होता, त्या सध्या जामीनावर बाहेर आहेत. त्यानंतर अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीला त्याच्या पत्नीचा सीडीआर मिळवून देण्यात मदत करणारा वकिल रिझवान सिद्दीकी याला ठाणे पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

# भिवंडी शहराची वाटचाल अस्वच्छतेकडे


**भिवंडी-** केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या वेगवान गतीने स्वच्छतेकडे वाटचाल करणाऱ्या शहरांच्या यादीत आघाडीवर असलेल्या भिवंडी शहरात गेल्या काही दिवसांपासून जागोजागी घाणीचे साम्राज्य पसरले असून मागील दोन वर्षांपासून या शहरात नालेसफाईच झाली नसल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. ठिकठिकाणी साचलेला कचरा, रस्त्याच्या कडेला दिसणारे घाणीचे ढीग यामुळे रहिवाशांच्या नाकी नऊ आले असताना तब्बल दोन वर्षांनंतर या शहरात नालेसफाईची कामे सुरू करण्यात आली आहेत. शहरातील महत्त्वाचे चौक तसेच तीनबत्ती, बाजारपेठ, कणेरी, गुलजार हॉटेल, शिवाजीनगर, निजामपुरा पोलीस स्टेशन, ऐरोज हॉटेलचा परिसरात पहिल्याच पावसात पाण्याखाली गेला असून याठिकाणी अस्वच्छतेने टोक गाठल्याचे चित्र



दिसू लागले आहे. नियोजनाच्या आघाडीवर फसलेले शहर म्हणून भिवंडीचा नेहमीच अग्रक्रम राहिला आहे. बेकायदा बांधकामे, चोरीच्या नळजोडण्या, अवैध व्यवसाय यामुळे चर्चेत राहिलेल्या या शहराला केंद्र सरकारने नुकताच वेगाने स्वच्छतेकडे वाटचाल करणारे शहर असा मान दिला. यासंबंधी करण्यात आलेल्या सर्वेक्षणात भिवंडी शहर आघाडीवर गेल्याने शहरातील नागरिक अचंबित झाले. केंद्र सरकारमध्ये सत्तेवर असलेल्या पक्षातील स्थानिक नेते मात्र या मुद्द्यावरून स्वतची पाठ थोपटवून घेताना दिसत आहे. असे असताना पहिल्याच पावसात भिवंडीतील घाणीचे पितळ उघडे पडले असून यानिमित्ताने या शहरात मागील दोन वर्षांपासून नालेसफाईची कामे झालीच नसल्याची धक्कादायक माहिती पुढे येत आहे. साधारणपणे पावसाळा सुरू होण्यापूर्वीच सर्वच शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर नालेसफाईची कामे हाती घेतली जातात.

# वसई-विरार महापालिका : अनधिकृत बांधकाम नियंत्रण समिती बरखास्त

**विरार-** वसई विरार शहरातील वाढत्या बेकायदा बांधकामांवर नियंत्रण व कारवाई करण्यात अपयशी ठरलेली व पालिका आयुक्तांनी स्वत: स्थापन केलेली महानगरपालिकेची अनधिकृत बांधकाम नियंत्रण समिती गुरुवारी बरखास्त केल्याची माहिती पालिका आस्थापना विभागाचे प्रमुख रवी पाटील यांनी लोकमतला दिली आहे. दरम्यान दोन वर्षांपूर्वीच दस्तुरखुद्द पालिका आयुक्त सतीश लोखंडे यांनी स्वत:च्या अध्यक्षतेखाली पालिकेतील विविध विभाग व त्यांचे उपायुक्त, सहा. आयुक्त व इतर अधिकारी मिळून अशी एक महत्वाची समिती स्थापन केली होती, तिने प्रत्येक प्रभागातील अनधिकृत बांधकामावर अंकुश म्हणून अतिक्र मण विभाग व सहा. आयुक्तांच्या मदतीने त्यावर नियंत्रण ठेऊन बेकायदा बांधकाम धारकाला वेळीच नोटीस बजावणे, गुन्हे दाखल करणे अथवा न्यायालयीन कारवाई करणे तसेच प्रसंगी निष्कासनाची कारवाई करणे आदी जबाबदाऱ्या नेमून दिल्या होत्या, मात्र तरीही शहरात अवैध बांधकामे वाढत होती. या समितीतील काही निवडक सदस्यांवर गुन्हे, भ्रष्ट कारभाराचे आरोप तर काहिंवर निलंबनाची कारवाई झाली.



# प्लास्टिक बंदीबाबत पालिका उदासीन

**वसई-** २३ जूनपर्यंत शहर प्लास्टिकमुक्त करू, हा वसई-विरार महापालिकेचा दावा फोल ठरणार आहे. शहरातील प्लास्टिक बंदीवरील कारवाई थंडावली असून महापालिका याबाबत उदासीन असल्याचे दिसून येत आहे. विधान परिषद निवडणुकीमुळे पालिकेचे कर्मचारी त्यासंदर्भातील कामांत व्यग्र असल्याने प्लास्टिक बंदीबाबतची कारवाई करता आली नाही, असे पालिकेचे म्हणणे आहे. राज्य सरकारने सर्व महापालिकांची बैठक गेल्या महिन्यात घेतली होती. त्यात २३ जूनपर्यंत प्रत्येक शहर प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. प्लास्टिकमुक्त शहर बनवण्यासाठी कशा प्रकारे कारवाई करायची याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या होत्या. मात्र वसई-विरार शहरात ही कारवाई थंडावली आहे. कारवाई होत नसल्याने सर्रास प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे आढळून येत आहे. प्लास्टिक बंदीबाबत कसलीच जागरूकता नसल्याने नागरिक आणि विक्रेतेही अनभिज्ञ आहेत. महापालिकेने मात्र निवडणुकांच्या कामांमुळे कर्मचाऱ्यांचा तुटवडा असल्याने कारवाई करता आली नाही, असे सांगितले. निवडणुकीच्या कामात कर्मचारी व्यग्र असल्याने प्लास्टिक बंदीच्या कारवाईसाठी विशेष पथकही स्थापन करता आलेले नाही.



# पारसिक बोगदा गळतीमुक्त होणार!

**दिवा-** मध्य रेल्वे मार्गावरील सर्वात जुना बोगदा असलेल्या आणि अतिक्रमणामुळे धोकादायक ठरलेल्या पारसिक बोगद्याची दुरुस्ती करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या बोगद्यातून होणारी पाण्याची गळती आणि त्यामुळे बोगद्याला निर्माण झालेला धोका पाहता त्याच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. या कामाला जून महिन्याच्या अखेरीस सुरुवात केली जाईल, अशी माहिती देण्यात आली. मध्य रेल्वेच्या ठाणे ते कल्याण जलद मार्गावरील दिव्याजवळच १.३ किलोमीटर अंतराचा पारसिक बोगदा आहे. हा बोगदा १८७३ मध्ये पारसिक हिलमध्ये बांधण्यात आला. बोगद्यात दुहेरी मार्गिका टाकून ठाणे ते कल्याण आणि त्यामार्गे जाणाऱ्या लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी मार्गिका उपलब्ध करण्यात आली. त्यामुळे या मार्गावरील अंतर बरेच कमी झाले. मात्र, वर्षांनुवर्षे या बोगद्याच्या डागडुजीकडे लक्ष न देण्यात आल्याने तो धोकादायक बनू लागला आहे. बोगद्याच्या वरच्या भागातून वर्षभर या बोगद्यात पाणी पडते. या बोगद्यात २४ हजार व्होल्टेज उच्च दाबाच्या ओव्हरहेड तारांसह अन्य विद्युत उपकरणोही आहेत. त्यामुळे या ठिकाणी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त होत आहे. याखेरीज बोगद्यावरून पडणाऱ्या पाण्यामुळे त्याची मातीही भुसभुशीत होत आहे. त्यामुळे येथून जाणाऱ्या लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी वेगमर्यादाही आखून देण्यात आली आहे.

# अर्नाळा, राजोडी किनाऱ्यावरच अंत्यविधी

## स्मशानभूमीची सोय असतानाही वापर नाही; पर्यटकांना त्रास



**विरार-** मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमींची सोय असतानाही अर्नाळा आणि राजोडी येथील समुद्रकिनाऱ्यावर उघड्यावरच अंत्यसंस्कार करण्यात येत असल्याचे प्रकार वाढीस लागले आहे. अंत्यसंस्कार केल्यानंतर त्यासंबंधित साहित्य किनाऱ्यावर तसेच पडलेले असते. त्याचा त्रास पर्यटकांना होत आहे. वसईतील पर्यटनाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा किनारा म्हणजे अर्नाळा आणि राजोडी समुद्रकिनारा. त्यातच नुकताच पार पडलेल्या अर्नाळा महोत्सवात पर्यटनाविषयी मोठ्या प्रमाणावर ब्रॅण्डिंग झाले आहे. त्यामुळे येथे पर्यटकांचा ओघ वाढतच आहे. परंतु या किनाऱ्यावर पर्यटकांसाठी सोयीसुविधांचा अभाव आहे. त्याचबरोबर आता या किनाऱ्यावर मृतदेहावर अग्निसंस्कार करण्यात येत आहे. अर्नाळा आणि राजोडी या किनाऱ्यांजवळच स्मशानभूमी आहे. या स्मशानभूमींमध्ये योग्य त्या सोयीसुविधा असतानाही तिथे अंत्यसंस्कार न करता किनाऱ्यावरच अंत्यविधी केला जात आहे. अंत्यसंकारावेळी आणण्यात आलेली गादीही तशीच या ठिकाणी टाकून ग्रामस्थ जातात. त्याशिवाय मातीच्या मडक्याचे तुकडे आणि इतर वस्तू तशाच पडून असतात. मडक्याचे तुकडे नागरिकांच्या पायाला लागून दुखापत होण्याची शक्यता असते. मृतदेहाचे अंत्यसंस्कार स्मशानभूमीतच करण्यात यावे, अशी मागणी पर्यटकांनी केली आहे. किनाऱ्यावर उघड्यावर अंत्यसंस्कार केल्यामुळे पर्यटकांची संख्या घटू शकते, अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे.

# सेनाप्रमुखांचे शिलेदारच संतापले; सेनेत अस्वस्थता



**मुंबई-** निवडणुका तोंडावर आलेल्या असताना शिवसेनेतील शिवसेनाप्रमुखांच्या शिलेदारांनी एकत्र येत सेनेच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त केल्याने खासकरून मुंबईतील शिवसेनेत कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. आम्ही शिवसेनेच्या पायाचे दगड आहोत. आमच्यात आजही तलवार उचलण्याची ताकद आहे. आम्हाला पदे नकोत. आम्ही निवृत्तीवेतन मागत नाही, सन्मान मिळावा हीच इच्छा आहे; पण उद्धवजींना खरंच आमची गरज आहे का, असा थेट सवाल करत शनिवारी ज्येष्ठ शिवसैनिकांनी आपल्या अस्वस्थतेला वाट मोकळी करून दिली.

शिवसेनेच्या स्थापनेपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या खांद्याला खांदा लावून शिवसेना वाढीसाठी आंदोलन करणाऱ्या ज्येष्ठ शिवसैनिकांचे शनिवारी दादर येथील देवराज सभागृहात संमेलन संपन्न झाले. या संमेलनाला शिवसेना नेते मनोहर जोशी, लीलाधर डाके, सतीश प्रधान, माजी महापौर महादेव देवळे, दिलीप नाबर बाळासाहेबांचे अंगरक्षक यांच्यासह ७० ते ७५ च्या वयोगटातील सुमारे २५० शिवसैनिक उपस्थित होते. मनोहर जोशी यांनी आपल्या भाषणात ज्येष्ठ शिवसैनिकांचा ग्रुप का तयार झाला, असा थेट सवाल केला. तुमच्या मनात काही शंका असतील तर विचारा, असे सांगून ज्येष्ठ शिवसैनिकांच्या मनातील भावना जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र कोणीही काहीच बोलले नाही. पण जोशी निघून जाताच शिवसैनिकांनी आपल्या मनातील खदखद अन्य नेत्यांसमोर बोलून दाखवली. आपली नाराजी त्यांनी स्पष्टपणे व्यक्त केली. शिवसेना वाढवण्यासाठी आम्ही अनेक केसेस अंगावर घेतल्या. जेलमध्ये गेलो. कधीही पळ काढला नाही. बाळासाहेबांनी पाजलेले बाळकडू आजही रक्तात आहे. आम्ही आमदार, खासदार, नगरसेवक एवढेच काय पक्षाचे कुठले पदही मागत नाही; पण पक्षाला आमची खरच गरज आहे का, असा परखड सवाल उपस्थित केला.

साहेब नेहमी म्हणायचे, शिवसेनेत दोन पदे आहेत. एक शिवसेनाप्रमुख व दुसरे शिवसैनिक. त्यामुळे आम्हाला मानाने वागवा, असा जणूकाही इशाराच सेनाप्रमुखांच्या या शिलेदारांनी दिला. तुम्ही प्रवाहातील शिवसैनिक आहात प्रसादाचे नाही. घराच्या बाहेर जेवढ्या जास्त चप्पल दिसतील ती तुमची श्रीमंती ! साहेबांची ही शिकवण आजही लक्षात आहे. त्यामुळे पदासाठी कधीही लाचार झालो नाही.

## बँकेत पैसे ठेवले तर नीरव मोदी नेतो, घरी ठेवले तर नरेंद्र मोदी आयटीकडे पाठवतात

**परभणी-** भारतीय कामगार सेना वीज युनिटच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनात रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात सूर उमटले. खासदार चंद्रकांत खैरे यांच्या उपस्थित झालेल्या या



महाअधिवेशनात कामगार सेनेचे अध्यक्ष आ.सूर्यकांत महाडिक यांनी मोदी हे कामगारांचे दुष्मन आहेत. ते कामगारविरोधी धोरणे राबवत आहेत. बँकेत पैसे ठेवले तर नीरव मोदी नेतो तर घरात ठेवले तर नरेंद्र मोदी आयटी विभागाला पाठवतात, अशी टीका केली. दरम्यान, या अधिवेशनात महावितरण कंपनीचे खासगीकरण थांबवावे, वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी, यासह सहा महत्त्वपूर्ण ठरावही पारित करण्यात आले. महाअधिवेशनाचे उद्घाटन अक्षदा मंगल कार्यालयात शिवसेना नेते खा. चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कामगार सेनेचे अध्यक्ष आ.सूर्यकांत महाडिक होते. वीज युनिट कामगार सेनेचे कार्याध्यक्ष राजन भानुशाली, शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख डॉ. विवेक नावंदर, जिल्हा प्रमुख संजय कच्छवे, माजी जिल्हाप्रमुख गंगाप्रसाद आनेराव आदींची प्रमुख उपस्थिती होती. निमंत्रक व स्वागताध्यक्ष आ.डॉ. राहुल पाटील होते. निमंत्रक डॉ. पाटील यांनी वीज कामगारांच्या प्रश्नावर आगामी काळात अधिक आक्रमक भूमिका घेऊन त्यांचे प्रश्न सोडवले जातील, अशी ग्वाही दिली. देशात मोदी सरकार हे कामगारविरोधी धोरणे राबवू लागले आहे. त्यामुळे नरेंद्र मोदीच कामगारांचे खरे दुष्मन आहेत. शंभर कामगार असणारी कंपनी बंद करण्याचा अधिकार मालकाला दिला जात आहे. यातून कामगारांना संपवण्याचाच घाट घातला जात आहे, असा आरोप आ. महाडिक यांनी केला. स्वबळावर सत्ता आणायचीय; कामगारांच्या विरोधातील मोदी सरकारच्या विरोधात आता कामगारांनाच एकत्र यावे लागणार आहे. आगामी काळात कामगारांचे संघटन मजबूत करून त्यांच्या पगारवाढीच्या व पेन्शनच्या प्रश्नावर लढा उभा करावा लागणार आहे. त्यासाठी भाजपविरोधात सर्व कामगारांनी एकत्र यावे व शिवसेनेला स्वबळावर सत्ता आणण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन खा. खैरे यांनी केले.

## अल्पमुदतीसाठी सोने आणि चांदी मंदीत

**नवी दिल्ली-** मागील आठवड्याची निर्देशांकांची सुरुवात तेजीने झाली. सोमवार आणि मंगळवारच्या सत्रात झालेल्या तेजीनंतर मात्र निर्देशांकात घसरण झाली. शेवटच्या सलग तीन दिवस झालेल्या कामकाजात निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये मंदी होत आठवड्याच्या शेवटी निर्देशांक अत्यंत मर्यादित तेजीसह बंद झाले. मागील आठवड्यात सेन्सेक्स ३५६२८ ते ३४७८५ आणि निफ्टी १०७५५ ते १०८९३ या पातळीत राहिले.



फंडामेंटल ॲनालिसिस केल्यावर तुम्हाला निर्देशांक महाग आहे की स्वस्त आहे, याचा अंदाज येत असतो. साधारणपणे ज्यावेळी निर्देशांक हा महाग असतो त्यावेळी त्याला आपण निर्देशांक ओवर वॅल्यू झाला असे म्हणत असतो. निर्देशांक ओवर वॅल्यू असताना कमीत कमी जोखीम पत्करून अल्प काळासाठी गुंतवणूक करणे आवश्यक असते व दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक करावयाची असेल तर मात्र टप्प्याटप्प्याने सातत्याने शेअर खरेदी करत राहणे आवश्यक असते. निर्देशांकाचे मूल्य हे जर स्वस्त असेल तर आपण निर्देशांक हा अंडर वॅल्यू आहे असे म्हणतो. निर्देशांक अंडरवॅल्यू असताना मध्यम तसेच दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक केल्यास चांगला फायदा होत असतो. शेअर बाजारामध्ये दीर्घ मुदतीसाठी शेअर खरेदी करावयाची असेल तर योग्य शेअर निवडून पैशाचे योग्य नियोजन करून सातत्याने शेअर खरेदी करणे आवश्यक असते. टेक्निकल ॲनालिसिसनुसार जरी निर्देशांकाची दिशा तेजीची असली तरी काळजीपूर्वक व्यवहार करणे आवश्यक आहे. कमोडीटी मार्केटचा विचार करता, टेक्निकल ॲनालिसिसनुसार या आठवड्यात झालेल्या घसरणीनंतर सोन्याची दिशा आणि गती ही अल्प मुदतीसाठी मंदीची झालेली आहे. आता सोन्याची ३१४१८ ही अत्यंत महत्त्वाची विक्रीची पातळी आहे. जोपर्यंत सोने या पातळीच्या खाली आहे तोपर्यंत सोन्यामधील मंदी कायम राहील.

## मॉन्सूनची वाटचाल 'जैसे थे' राहणार

### हवामान खात्याचा अंदाज, कोकणात दाखल

**पुणे-** नैर्ऋत्य मोसमी पावसाच्या (मॉन्सून) सरी कोकण किनारपट्टीवर बरसण्यास रविवारी सुरवात झाली. तर, घाटमाथा, मध्य महाराष्ट्रातही तुरळक ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. येत्या मंगळवारपासून (ता. १९) कोकणात बहुतांशी ठिकाणी, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता असून, बुधवारपासून (ता. २०) या भागात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. दरम्यान, मॉन्सूनच्या पुढील वाटचालीस पोषक स्थिती नसल्याने आणखी काही दिवस मॉन्सूनची वाटचाल 'जैसे थे' राहणार असल्याचे हवामान विभागातर्फे स्पष्ट करण्यात आले. मॉन्सूनचा प्रवाह मंदावला आहे. सुमारे आठ दिवसांपासून मॉन्सूनने विश्रांती घेतली आहे. त्यानंतर आता



कोकणासह मध्य महाराष्ट्रातील काही भागांत पावसाच्या तुरळक सरी पडण्यास सुरवात झाली आहे. कोकण किनारपट्टीवर ढगांची दाटी झाली, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात हलके ढग जमा झाले

## देशभरात सुरु होणार २५ हजार नवे पेट्रोल पंप

**नवी दिल्ली-** देशातील सरकारी तेल कंपन्या एकाच वेळेस २५ हजार नवे पेट्रोल पंप उघडण्याच्या योजनेवर काम करत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने पेट्रोप पंपाच्या डीलरशिपसाठी नियुक्ती करण्यासाठी असलेली पॉलिसी रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे इंडियन ऑईल, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम यांना मागणीनुसार आपल्या नियमांमध्ये बदल करता येणार आहेत. तसेच नवे पेट्रोल पंप उघडण्याची स्वातंत्रता मिळणार आहे.



मंत्रालयाने गेल्या महिन्यात तेल कंपन्यांना पेट्रोप पंप डीलर्सच्या नियुक्तीसाठी गाईडलाईन्स बनवण्यास सांगितलं होतं. त्यावर कंपन्यांनी सरकारला सांगितलं की, पेट्रोल-डिझेलच्या किमतीवर असलेलं नियंत्रण हटल्यावर डीलर्सच्या नियुक्तीसाठी सरकारी गाईडलाईन्सची आवश्यकता लागणार नाही. तसेच कंपन्यांनीही नव्या डीलरच्या निवडीसाठी आपले नियम आणि अटी तयार केल्या आहेत. पुढील महिन्याभरात तिन्ही तेल कंपन्या देशभरात २५ हजार ठिकाणी पेट्रोप पंप सुरु करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करणार आहे. तसेच इच्छुकांकडून अर्ज मागवणार आहे. यामध्ये बहुतांश पेट्रोल पंप ग्रामिण भागात असणार आहे. देशभरात सध्या ५७ हजार पेट्रोल पंप सरकारी कंपन्यांचे आहेत आणि ६ हजार पेट्रोल पंप प्रायव्हेट कंपन्यांचे आहेत.

## घटस्फोटित महिलेच्या मुलीला आईची जात!

**अहमदनगर-** जी जात नाही ती जात, असं जातीबद्दल बोललं जातं. अपत्याला जन्मजात वडिलांची जात मिळते मात्र अहमदनगरमध्ये एका मुलीला तिच्या आईची जात लावण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. घटस्फोटित महिलेच्या अपत्याला मागास प्रवर्गाचं जात प्रमाणपत्र देण्यात आलं आहे.



संबंधीत मुलीच्या वडिलांचा खुला प्रवर्ग असल्याने तिला मागास प्रवर्गातील जात प्रमाणपत्र नाकारण्यात आलं होतं. मात्र जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने हा निर्णय नुकताच घेतला आहे. या निर्णयाने राज्यभरातील अनेक अपत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कुमारी माता, घटस्फोटित परित्याक्त्या, लिव्ह-इन-रिलेशनशिपनंतर विभक्त झालेल्या आणि प्रेम प्रकरणातून झालेल्या अपत्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कर्जतमधील कोपर्डीच्या एका हिंदू महिलेचं औरंगाबादच्या मुस्लीम व्यक्तीसोबत प्रेमप्रकरणातून १९९९ साली आंतरजातीय विवाह झाला होता. संबंधित महिला मागास प्रवर्गातील आहे तर तिचा तत्कालीन पती खुल्या प्रवर्गातील आहे.

विवाहानंतर काही महिन्यातच दोघांमध्ये कौटुंबिक मतभेद झाले. २००० साली त्यांना मुलगी झाली. मात्र बाळंतपणानंतर संबंधित महिला माहेरीच थांबली. यानंतर या महिलेने आपल्या मुलीला स्वत:चं नाव देऊन शैक्षणिक प्रवेश घेतला. मुलीने स्वत:च्या नावापुढे आईचं नाव लागलं. २००५ साली दोघांनी घटस्फोटही घेतला. प्राथमिक शिक्षणानंतर संबंधित मुलगी २०१८ साली बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झाली. मात्र बारावीत असताना मुलीने २०१६-१७ कर्जत प्रांत अधिकाऱ्यांकडे कुणबी (इतर मागासवर्गीय) प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. मा‍ उपविभागीय अधिकारी यांनी अर्जदारानं केवळ आईचे पुरावे जोडलेत. वडिलांचे पुरावे सादर केलं नाहीत. वडिलांचीच जात अपत्याला लागत असल्याचं सांगत प्रमाणपत्र नाकारलं होतं.

## राज्यात शिक्षकांचे ३१ प्रकार

**सोलापूर-** राज्याचा शिक्षण विभाग नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. मग कधी जुन्या पेन्शनचा मुद्दा असो किंवा शिक्षकांच्या बदलीचा. या सगळ्या प्रकारामुळे शिक्षण विभागाची मोठ्या प्रमाणात बदनामी होत असते. त्यातच आता राज्यातील शिक्षकांचे प्रकार किती, हा मुद्दा सोशल मीडियातून चर्चेला जाऊ लागला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शिक्षण विभाग चर्चेत आला आहे. मागील काही वर्षांमध्ये शिक्षण विभागात ऑनलाइन कामाला महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची माहिती ही ऑनलाइन भरण्याचे आदेश दिले आहेत. त्याला काही प्रमाणात शिक्षकांनी विरोध केला; पण शेवटी नाईलाजाने



ऑनलाइनचे काम शिक्षकांना करावेच लागले. शिक्षकांच्या प्रकारांचा विचार केला, तर प्रशासनाने अनेक प्रकार केले आहे. त्यामुळे कुणाचाच कुणाला मेळ लागत नसल्याचे स्पष्ट होते. राज्यामध्ये १०० टक्के अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयं अर्थसाहाय्यित, पायाभूत पदवाढ प्रस्तावित, पायाभूत पद मंजूर; परंतु वैयक्तिक मान्यता प्रलंबित, पायाभूत पद मंजूर, वैयक्तिक मान्यता प्राप्त; परंतु आर्थिक तरतुदींच्या प्रतीक्षेतील, अनुदानास पात्र घोषित तुकडीवरील, शिक्षकांचे असंख्य प्रकार आपल्या प्रशासनाने तयार केले आहेत.

## बसपचा काँग्रेससोबत आघाडीला फुलस्टॉप!

**भोपाळ - केंद्रातील भाजप विरोधातील विरोधकांच्या एकजुटीला पहिला मोठा धक्का बसला आहे. कर्नाटकातील सत्तास्थापनेनंतर विरोधकांनी अन्य राज्यातील विधानसभा आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने ऐक्याची तयारी सुरु केली होती. पण या ऐक्याला आता तडा जाण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशच्या आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेससोबत आघाडीच्या चर्चेला बसपच्या वरिष्ठ नेत्यांनी पूर्णविराम दिला आहे. येत्या निवडणुकीत बसपा २३० जागा स्वबळावर लढणार असल्याचे बसपच्या वरिष्ठ नेत्यांनी म्हटले.**

बसपचे प्रदेश अध्यक्ष नर्मदा प्रसाद अहिरवार यांनी सांगितले की, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत बसप आणि काँग्रेस आघाडी करणार असल्याची जोरदार चर्चा काँग्रेसमध्ये सुरू आहे. पण, मी हे स्पष्ट करू इच्छितो की, राज्य आणि केंद्रीय पातळीवर बसपची काँग्रेससोबत कोणत्याही प्रकारच्या आघाडीची चर्चा सुरू नाही.



आम्ही मध्य प्रदेशमध्ये २३० जागांवर निवडणूक लढवणार आहोत. मला पक्षाकडून युती संदर्भातील कोणतेही आदेश देण्यात आलेले नाहीत, असेही ते म्हणाले.

दरम्यान, प्रदेश काँग्रेसने बसपसोबतच्या आघाडीवर बोलण्यास नकार दिला. मध्य प्रदेश काँग्रेस माध्यम प्रमुखांनी सांगितले की, आम्ही कोणत्याही पक्षाचे नाव घेतलेले नाही. काँग्रेसने फक्त इतकेच स्पष्ट केले होते की, समविचारसरणी असलेल्या पक्षासोबत आम्ही युती करू शकतो. आम्ही कधीही बसपचे नाव घेतलेले नाही. आगामी निवडणुकांमध्ये राजकीय परिस्थिती कशी असेल त्यावर युतीचा निर्णय अवलंबून आहे.


राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठीची घोषणा नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात होऊ शकते. मध्य प्रदेशमधील २०१३ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसने ३६.३८ टक्के तर बसपने ६.२९ टक्के मते मिळवली होती. भाजपने या निवडणुकीत ४४.८८ टक्के मते मिळवली होती. विधानसभेच्या २३० जागांपैकी भाजपने १६५, काँग्रेसने ५८ आणि बसपने ४ जागांवर विजय मिळवला होता.

## मुलांना दूर करणे अत्यंत शरमेची बाब -संयुक्त राष्ट्रसंघ

**वॉशिंग्टन-** अवैध प्रवेशबंदीच्या नावाखाली मुलांना त्यांच्या पालकांपासून दूर करणे ही अत्यंत शरमेची बाब आहे, अशा कठोर शब्दात संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाने अमेरिकेवर ताशेरे ओढले आहेत. गेल्या सहा आठवड्यांपासून अमेरिकेतील अवैध प्रवेश रोखण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प सरकारकडून कठोर उपाययोजना करण्यात येत आहेत. या प्रक्रियेदरम्यान तब्बल २००० हजार मुलांना त्यांच्या पालकांपासून दूर करण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एप्रिल मध्यापासून ते मे महिन्यांच्या अखेरपर्यंत होमलँड सुरक्षा विभागाकडून ही आकडेवारी समोर आली आहे. तब्बल १९९५ मुलांना १९४० पालकांकडून वेगळे करण्यात आले आहे. अवैधरित्या केलेला प्रवेश, स्थलांतरित कायद्याचे उल्लंघन अशा कारणांखाली त्यांना विभक्त करण्यात आले आहे. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर स्थलांतरितांच्या प्रश्नावरून जगभरातून सडकून टीका केली जात आहे. यामध्ये राजकीय नेते, चर्च तसेच मुलांच्या हक्कासाठी काम करणाऱ्या संघटनांचा समावेश आहे. सोशल मिडीयावरही #WhereAreTheChildren व #MissingChildren नावाने हॅशटॅग चालवले जात आहेत. ज्या मुलांना पालकांपासून दूर करण्यात आले आहे त्यांची सोय सरकारकडून केली आहे.



त्याचबरोबर निर्वासित पुर्नवसन विभाग त्या मुलांचे जवळचे नातेवाईक शोधण्याचा प्रयत्न करत आहे.अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्वासितांचा प्रश्न नीटपणे न हाताळल्यामुळे ही परिस्थिती ओढवल्याचे सांगत डेमोक्रॅटीक पक्षावर खापर फोडले आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)